लातूर शहर महानगरपालिका,लातूर
मुख्य कार्यालय:- मेन रोड,लातूर
(सामान्य प्रशासन विभाग)

स्थापना-२५ ऑक्टोबर २०११

फोन:०२३८२,२४२८०३,२४६०७५
फॅक्स:०२३८२,२४६०७४
ई मेल - mclatur@yahoo.co.in

हेल्प लाईन नंबर ९१ ९५१३६३१४५९

जा.क्र./लाशमनपाला/सामान्य प्रशासन विभाग/८०८/२०२३ दिनांक:२०/१२/२०२३

## पदभरतीसाठी जाहिरात २०२३

लातूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्रेणी- अ, श्रेणी -ब व श्रेणी - क मधील रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात क्र. १ दि. २२ डिसेंबर, २०२३ अन्वये प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रस्तुत जाहिरातीमधील पदे ही प्रशासकीय, तांत्रिक, विधी, पर्यावरण अभियांत्रिकी सेवा, वैद्यकीय सेवा, अभियांत्रिकी सेवा, निम वैद्यकीय सेवा व अग्निशमन सेवेमधील आहेत.त्यामुळे तुलनात्मक स्पर्धा होण्यासाठी पुरेसे उमेदवार असणे आवश्यक आहे.तसेच प्रस्तुत भरतीसाठी पुरेसा प्रतिसाद प्राप्त होण्याकरिता जाहिरात देण्यात येत आहे.त्यामुळे सदर निवेदनाव्दारे कळविण्यात येते की जाहिरात क्र. १ दि.२२ डिसेंबर, २०२३ नुसार श्रेणी -अ, श्रेणी -ब व श्रेणी -क मधील ८० पदाकरिता अर्ज करण्याचा कालावधी दि.२२ डिसेंबर, २०२३ शुक्रवार दुपारी ४.०० वाजे पासुन ते दि.१४ जानेवारी, २०२४ रविवार रात्री ११.५९ पर्यंत आहे.इच्छुक उमेदवारांनी www.mclatur.org या संकेतस्थळावर दि.१४ जानेवारी, २०२४ रविवार रात्री ११.५९ वाजे पर्यंत Online पध्दतीने अर्ज करावा.उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | वेतन श्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | पर्यावरण अभियांत्रिकी सेवा श्रेणी-१ | पर्यावरण संवर्धन अधिकारी | S-२० ५६१००-१७७५०० | १ |
| २ | तांत्रिक सेवा श्रेणी-१ | सिस्टिम मॅनेजर ई-प्रशासन | S-१५ ४१८००-१३२३०० | १ |
| ३ | वैद्यकीय सेवा श्रेणी-२ | वैद्यकीय अधिक्षक (मनपा दवखाने विभाग) | S-१५ ४१८००-१३२३०० | १ |
| ४ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-२ | शाखा अभियंता (स्थापत्य) | S-१५ ४१८००-१३२३०० | २ |
| ५ | विधी सेवा श्रेणी -२ | विधी अधिकारी | S-१५ ४१८००-१३२३०० | १ |
| ६ | अग्निशमन सेवा श्रेणी-२ | अग्निशमन केंद्र अधिकारी | S-१५ ४१८००-१३२३०० | १ |
| ७ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | S-१४ ३८६००-१२२८०० | ४ |
| ८ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (पा.पु) | S-१४ ३८६००-१२२८०० | ४ |
| ९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | S-१४ ३८६००-१२२८०० | १ |
| १० | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | कर अधिक्षक | S-१४ ३८६००-१२२८०० | २ |
| ११ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी-३ | औषध निर्माता (फार्मासिस्ट) | S-१३ ३५४००-११२४०० | १ |
| १२ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | सहाय्यक कर अधिक्षक | S-१३ ३५४००-११२४०० | ४ |
| १३ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | कर निरीक्षक | S-१० २९२००-९२३०० | ४ |
| १४ | अग्निशमन सेवा श्रेणी-३ | चालक - यंत्रचालक | S-६ १९९००-६३२०० | ९ |
| १५ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | लिपीक टंकलेखक | S-६ १९९००-६३२०० | १० |
| १६ | अग्निशमन सेवा श्रेणी-३ | फायरमन | S-५ १८०००-५६९०० | ३० |
| १७ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | व्हॉलमन | S-१ १५०००-४७६०० | ४ |

## ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | दि. २२ डिसेंबर, २०२३ शुक्रवार , दुपारी ४.०० वाजेपासून |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.१४ जानेवारी, २०२४ रविवार, रात्री ११.५९ वाजेपर्यंत |
| ३ | ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | दि.१४ जानेवारी, २०२४ रविवार, रात्री ११.५९ वाजेपर्यंत |
| ४ | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या ७ दिवस आधी |
| ५ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | जानेवारी/फेब्रुवारी २०२४ (संभाव्य) |

*परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र प्रवेशपत्रामध्ये नमूद केले जाईल.संभाव्य बदला बाबत वेळोवेळी लातूर शहर महानगरपालिका www.mclatur.org संकेतस्थळावर माहिती उपलब्ध केली जाईल.

ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत इत्यादी बाबतचा तपशील व ऑनलाईन अर्ज करण्यासाठी खालील संकेत स्थळावर भेट देण्यात यावी. तसेच संवर्गनिहाय भरावयाची पदे, पदांचा तपशिल, वेतनश्रेणी, वयोमर्यादा,निवड पध्दत, सर्व साधारण सूचना, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच आरक्षणाबाबत तरतूदी, पदनिहाय ऑनलाईन परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा शुल्क, अर्ज भरणेबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादी बाबतचा तपशील www.mclatur.org संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(बाबासाहेब मनोहरे)
आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

लातूर शहर महानगरपालिका,लातूर
मुख्य कार्यालय:- मेन रोड,लातूर
(सामान्य प्रशासन विभाग)

स्थापना-२५ ऑक्टोबर २०११

फोन:०२३८२,२४२८०३,२४६०७५
फॅक्स:०२३८२,२४६०७४
ई मेल - mclatur@yahoo.co.in


## भरती प्रक्रियेबाबत उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना

लातूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्रेणी- अ,ब व क मधील विविध संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा भरती प्रक्रियेव्दारे भरण्यासाठी प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणा-या पात्र उमेदवारांकडून www.mclatur.org या संकेतस्थळावर recruitment या tab वर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

### १. अर्ज भरणे व सादर करणे बाबत आवश्यक सुचना

| | |
|---|---|
| १.१ | उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.mclatur.org या लिंकवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी व नंतरच आपला अर्ज भरावा. |
| १.२ | उमेदवारास अर्ज सादर करताना काही समस्या उद्भवल्यास ९१ ९५१३६३१४५९ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा. |
| १.३ | ऑनलाईन फी भरणेसाठी दि.१४ जानेवारी, २०२४ रविवार, रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदत राहील. |
| १.४ | अर्जात हेतुपुरस्सरपणे खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवुन ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परिक्षेचे वेळी नक्कल (Copy) करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षे नंतरही गैरप्रकार करणा-या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षा निवडीसाठी अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, लातूर महानगरपालिका यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणुक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल. |
| १.५ | वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेले माध्यमिक (SSC) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्रावरील जन्म दिनांक ग्राह्य धरण्यात येईल. |
| १.६ | अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल. |
| १.७ | महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्रं. एस.आर.व्ही.-२०००/प्र.क्रं.१७/२०००/२०१२ दि. ०१.०७.२००५ नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| १.८ | शैक्षणिक अर्हते संदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमुद करावी. संबंधित परिक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल. |
| १.९ | गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणींची यादी सादर करावी. |
| | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.<br>१. उमेदवार प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे.<br>२. अर्ज सादरीकरण<br>३. शुल्क भरणा |
| | प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे.<br>१. www.mclatur.org संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता नवीन वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग इन पृष्ठ (Log in Pages) प्रदर्शित करेल. नविन खाते (वापर कर्त्याचे नांव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाद्वारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.<br>२. प्रोफाईलद्वारे माहिती भरताना उमेदवाराने स्वतःचाच वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.<br>३. उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध / कार्यरत राहणे आवश्यक आहे.<br>४. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वतःच्या Login व Password द्वारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचुक नोंद करावी. |

५. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे.

नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलद्वारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वतःचे छायाचित्र / फोटो (रुंदी ३.५ से.मी. x उंची ४.५ से.मी.) व स्वतःची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी.

१) एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहीत आकाराचा रंगीत फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवुन थेट स्कॅन करता येईल.

२) फोटोचा विहीत आकार (८०-२०० KB) असणे गरजेचे आहे.

३) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परीक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.

४) स्वाक्षरीचा विहीत आकार (८०-२०० KB) / क्षमतेप्रमाणे काळया शाईच्या (बॉल) पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी. उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.

५) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.

६) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यांत येईल.

**A. अर्ज नोंदणी**

१. उमेदवारांनी www.mclatur.org या संकेतस्थळावर जाण्यासाठी APPLY ONLINE या पर्यायावर क्लिक करा जे एक नविन स्क्रिन उघडेल.

२. अर्ज नोंदणी करण्यासाठी नविन नोंदणीसाठी येथे क्लिक करा टॅब निवडा आणि नांव, संपर्क तपशील आणि ई-मेल आयडी प्रविष्ठ करा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रिनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा. तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड दर्शविणारा ई-मेल आणि एसएमएस देखील पाठविला जाईल.

३. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरु शकत नसेल, तर तो सेव्ह आणि नेक्स्ट टॅब निवडुन आधीच एंटर केलेला डेटा जतन करु शकतो. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापुर्वी उमेदवारांना ऑनलाईन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी सेव्ह आणि नेक्स्ट सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि आवश्यक असल्यास त्यात बदल करावा. सर्व उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सबमिशन करण्यापुर्वी ते बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडळणी करुन घ्यावी.

४. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात भरलेले तपशील काळजीपुर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी करावी, कारण पूर्ण नोंदणी बटणावर क्लिक केल्यानंतर कोणताही बदल शक्य होणार नाही / करणे शक्य होणार नाही.

५. उमेदवाराचे नाव किंवा त्याचे / तिचे वडील / पती इ. चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहीलेले असावे, जसे ते प्रमाणपत्रे / गुणपत्रिका / ओळख पुराव्यामध्ये दिसते. कोणताही बदल / तफावत आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरु शकते.

६. तुमचे तपशील सत्यापित करा आणि जतन करा आणि पुढील बटणावर क्लिक करुन तुमचा अर्ज जतन करा.

७. फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.

८. नोंदणीपुर्वी संपूर्ण अर्जाचे पुर्वावलोकन (Review) आणि पडताळणी करण्यासाठी पुर्वावलोकन टॅबवर क्लिक करा.

९. आवश्यक असल्यास तपशील सुधारावा, आणि छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच नोंदणी पूर्ण वर क्लिक करा.

१०. पेमेंट टॅबवर क्लिक करा आणि पेमेंटसाठी पुढे जावे व सबमिट बटणावर क्लिक करावे.

**B. परीक्षा शुल्क भरणे**

ऑनलाईन मोड

१. डेबिट कार्ड (Rupay/Visa/Master Card/Maestro). क्रेडिट कार्ड. इंटरनेट बँकिंग, मोबाईल वॉलेट/ UPI वापरुन पेमेंट केले जाऊ शकते.

२. व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर, एक ई-पावती तयार होईल.

३. ई-पावती तयार न होणे अयशस्वी फी प्रदान दर्शविते.

४. उमेदवारांनी ई-पावती आणि फी तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घेणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| | C. स्कॅनिंग आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे<br>ऑनलाईन अर्ज करण्यापुर्वी उमेदवाराने खाली दिलेल्या वैशिष्टयांनुसार त्याचा / तिचा फोटो, स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.<br>❖ **छायाचित्र प्रतिमा ( ८०-२०० KB):-**<br>• छायाचित्र अलीकडील पासपोर्ट साईजचा रंगीत फोटो असणे आवश्यक आहे.<br>• फोटो हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढ-या, पार्श्वभुमीच्या विरुध्द घेतलेले असावे.<br>• टोपी आणि गडद चष्मा घालून काढलेले फोटो स्विकारले जाणार नाहीत.<br>• फाइलचा आकार ( ८०-२०० KB) दरम्यान असावा.<br>• स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार ( ८०-२०० KB)पेक्षा जास्त नसावा.<br>❖ **स्वाक्षरी:-**<br>• अर्जदाराला काळ्या शाईच्या पेनने पांढ-या कागदावर सही करावी लागेल.<br>o फाईलचा आकार ८०-२०० kb<br>❖ **कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया:-**<br>o ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.<br>o संबंधित लिंकवर क्लिक करा छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड करा.<br>❖ **तुमचा फोटो, स्वाक्षरी, अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.**<br>१. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.<br>२. ऑनलाइन अर्जामध्ये छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे.<br>३. उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे.<br>**टिप**:-ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घ्यावी व स्वत:जवळ ठेवावी. हार्ड कॉपी कोठेही जमा करण्याची आवश्यकता नाही. |
| १.१० | **अर्ज सादरीकरण:-**<br>१. सदर अर्ज लातूर महानगरपालिकेच्या www.mclatur.org संकेतस्थळावर दिनांक दि.२२ डिसेंबर, २०२३ शुक्रवार दुपारी ४.०० वाजे पासुन भरणेसाठी उपलब्ध होतील.<br>२. कृपया लक्षात घ्या की उमेदवारांनी परीक्षा शुल्क दिलेल्या पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाईन पध्दतीने अदा करावी. |
| १.११ | **परीक्षा शुल्क:-**<br>१. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु. १०००/-<br>२. मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु. ९००/-<br>३. फक्त ऑनलाइन पध्दतीनेच शुल्क अदा करण्यांत यावे.<br>४. माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क माफ राहील.<br>५. परीक्षा शुल्क भरल्याबाबतची ऑनलाईन चलनाची प्रत ऑनलाइन पध्दतीने केलेल्या अर्जाच्या प्रतीसोबत व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.<br>६. उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदाकरिता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील. |
| १.१२ | **सर्वसाधारण सुचना:-**<br>१. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वत:च करणे आवश्यक आहे.<br>२. **अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.** संक्षिप्तपणे (Abbreviations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमुद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.<br>३. महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापुर्वीचे नाव, लग्नानंतरचे नांव) त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे, विवाह नोंदणी दाखला जमा करणे आवश्यक आहे.<br>४. एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा वदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या वदला संदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.<br>५. पत्र व्यवहारासाठी स्वत:चा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यावसायीक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्र व्यवहारासाठी देऊ नये.<br>६. अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेल्या सारांश पत्रातील अथवा सादर केलेल्या |

| | |
|---|---|
| | कागदपत्रातील दावा यामध्ये फरक आढळुन आल्यास अर्जामधील माहिती अनधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास / मिळाल्यास उमेदवारी रद्द करण्यांत येईल.<br>७. संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरात / अधिसुचनेमध्ये दिलेल्या सर्व सुचनांचे काळजीपुर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल. व त्याच्या अधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल. |
| १.१३ | वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. या शिवाय दुस-या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील. |
| १.१४ | उमेदवाराने अर्जात स्वतःचे नांव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातुन अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपुर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास लातूर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. |
| १.१५ | उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. |
| १.१६ | अर्ज सादर केलेल्या उमेदवारास प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामूळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा. |
| १.१७ | भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्यानुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ या संकेतस्थळावर उपलब्ध होईल, याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाव्दारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही.याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| १.१८ | विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही. |
| १.१९ | वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग/क्रिमीलेअर प्रमाणपत्र,महिला, माजी सैनिक,अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, अनुभव पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे.अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही.उमेदवाराने अर्ज सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |
| १.२० | ज्या उमेदवारांना यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालय इ.कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमदेवारांनी देखिल स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील, तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणा-या उमेदवारांनी लातूर महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईटवर अर्ज ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. |

## २.ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | दि. २२ डिसेंबर, २०२३ शुक्रवार , दुपारी ४.०० वाजेपासून |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.१४ जानेवारी, २०२४ रविवार, रात्री ११.५९ वाजेपर्यंत |
| ३ | ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | दि.१४ जानेवारी, २०२४ रविवार, रात्री ११.५९ वाजेपर्यंत |
| ४ | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या ७ दिवस आधी |
| ५ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | जानेवारी/फेब्रुवारी २०२४ (संभाव्य) |

*परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र प्रवेशपत्रामध्ये नमूद केले जाईल.संभाव्य वदला वावत वेळोवेळी लातूर शहर महानगरपालिका संकेतस्थळावर माहिती उपलब्ध केली जाईल.

### उपलब्ध पदे व पद संख्या

१)पर्यावरण संवर्धन अधिकारी श्रेणी-अ

| पर्यावरण संवर्धन अधिकारी श्रेणी-अ | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकुण पदे |
| जागा-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

२)सिस्टिम मॅनेजर ई-प्रशासन श्रेणी-अ

| सिस्टिम मॅनेजर ई-प्रशासन श्रेणी-अ | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

३)वैद्यकीय अधिक्षक (मनपा दवखाने विभाग) श्रेणी-ब

| वैद्यकीय अधिक्षक (मनपा दवखाने विभाग) श्रेणी-ब | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

४)विधी अधिकारी श्रेणी-ब

| विधी अधिकारी श्रेणी-ब | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

५)अग्निशमन केंद्र अधिकारी श्रेणी-ब

| अग्निशमन केंद्र अधिकारी श्रेणी-ब | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

६)शाखा अभियंता (स्थापत्य) श्रेणी-ब

| शाखा अभियंता (स्थापत्य) श्रेणी-ब | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा-२ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |

७)कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) श्रेणी-क

| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) श्रेणी-क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा-४ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ४ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |
| महिला (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

८)कनिष्ठ अभियंता (पा.पु) श्रेणी-क

| कनिष्ठ अभियंता (पा.पु.) श्रेणी-क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा-४ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ४ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |
| महिला (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

९)कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) श्रेणी-क

| कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) श्रेणी-क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा-१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

१०)औषध निर्माता (फार्मासिस्ट) श्रेणी-क

| औषध निर्माता (फार्मासिस्ट) श्रेणी-क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा- १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

११)कर अधिक्षक श्रेणी-क

| कर अधिक्षक श्रेणी-क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा- २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |

१२)सहाय्यक कर अधिक्षक श्रेणी-क

| सहाय्यक कर अधिक्षक श्रेणी-क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा- ४ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ४ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |
| महिला (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

१३)कर निरीक्षक श्रेणी-क

| कर निरीक्षक श्रेणी-क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा-४ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ४ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |
| महिला (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

१४)चालक - यंत्रचालक श्रेणी-क

| चालक - यंत्रचालक श्रेणी-क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा-९ | १ | १ | १ | ० | ० | ० | २ | ० | १ | ३ | ९ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | २ | ७ |
| महिला (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |

१५)फायरमन श्रेणी-क

| फायरमन श्रेणी-क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा- ३० | ४ | २ | १ | १ | १ | ० | ६ | ० | ३ | १२ | ३० |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | १ | १ | १ | १ | ० | २ | ० | २ | ३ | १३ |
| महिला (३०%) | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | ० | १ | ४ | ९ |
| माजी सैनिक (१५%) | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ४ |
| अंशकालीन(१०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| खेळाडू (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

समांतर आरक्षणाप्रमाणे उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन शुध्दीपत्रक क्रमांकःसंकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दि.१९ डिसेंबर २०१८ नुसार कार्यवाही करणेत येईल.

१६)लिपीक टंकलेखक श्रेणी-क

| लिपीक टंकलेखक श्रेणी-क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूणपदे |
| जागा- १० | १ | १ | १ | ० | ० | ० | २ | ० | १ | ४ | १० |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | २ | ७ |
| महिला (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| माजी सैनिक (१५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| दिव्यांग (४%) | OA,BA,OL,BL,OAL,CP,LC,DW,AAV,MDY-१ | | | | | | | | | | |

१७)व्हॉलमन श्रेणी-क

| व्हॉलमन श्रेणी-क | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव पदे | एकूण पदे |
| जागा- ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | १ | ४ |
| रिक्त जागांचे प्रवर्ग निहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | १ | ४ |

| | |
|---|---|
| २.१ | उक्त नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल झाल्यास शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या किंवा अंतिम निवडीपूर्वी या संदर्भात निर्गमित होणा-या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| २.२ | समांतर आरक्षणाबाबत शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर २०१८ आणि शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.४१७/१६-अ, दिनांक २८ डिसेंबर २०१८ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या किंवा अंतिम निवडीपूर्वी या संदर्भात निर्गमित होणा-या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. |

**२.३** दिव्यांग आरक्षणाबावत सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक अपंग-२००४/५५/आ-२, दिनांक २७/०७/२००८, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२००४/६३९/प्र.क्र.९६/न.वि.-६, दिनांक ११/०२/२००९, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे २०१९ व शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०२१/प्र.क्र.३३/नवी-२८, दिनांक १६/०४/२०२१ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकुण पद संख्येपैकी असतील.

| पदनाम | कर्तव्ये/जबाबदारी | अपेक्षित शारिरीक क्षमता/पात्रता | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|---|
| लिपीक टंकलेखक | महानगरपालिकेतील लिपीक संवर्गाची सर्व कर्तव्य पार पाडणे, महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे | S.ST.W.BN.RW, SE,H,C,MF | C) OA,BA,OL,BL, OAL,CP,LC,DW,AAV, MDY |

FUNCTIONAL REQUIREMENT ABBREVIATIONS USED: S-Sitting, ST-Standing, W-Walking, BN-Bending, RW-Reading & Writing, SE-Seeing, H-Hearing, C-Commounication, MF-Manipulation with Fingers.

CATEGORY ABBREVIATIONS USED:OA-One Arm, OL-One Leg, BA-Both Arms, BL-Both Leg,OAL-One Arm and One Leg,CP-Cerebral Palsy, LC-Leprosy Cured, DW-Dwarfism, AAV-Acid Attack Victims, MDY-Muscular Dystophy.

**२.४** संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार/ व्यक्ती आरक्षित तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

**२.५** महिला, खेळाडू, दिव्यांग, अनाथ, माजी सैनिक, भूकंपग्रस्त, अंशकालीन, प्रकल्पग्रस्त यांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.६** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे -२, दिनांक १ जुले, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांकर:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागयांचे शुध्दीपत्रक क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे -२, दिनांक १० ऑक्टोबर, २०१७, व शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२ दि. ३० जून, २०२२ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**२.७** वि.जा.(अ), भ.ज.(ब),भ.ज.(क), भ.ज.(ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गाच्या उमेदवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**२.८** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचा अधिवास (Domcile)असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.तसेच महिला व बाल विभाग मंत्रालय,मुंबई यांचे शासन निर्णय क्र.महिला२०२२/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे २०२३ नुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षीत असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

**२.९** आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६/-अ, दिनांक ३१/०५/२०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**२.१०** खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील (EWS)उमेदवारांनी नॉन क्रिमिलेअर (NON CREAMY LAYER) प्रमाणपत्र ऐवजी EWS प्रमाणपत्र अपलोड करावे.

**२.११** जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग व बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२ डिसेंबर, २०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

| | |
|---|---|
| २.१२ | महाराष्ट्र शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग RTA-१०७९०/०/४८२/XVI-A दि.०३/०७/१९८० नुसार माजी सैनिकांच्या बाबतीत त्यांना लातूर शहर महानगरपालिकेच्या पदभरतीच्या अनुषंगाने अर्ज करत असताना भराव्या लागणा-या परीक्षा शुल्का पासुन सुट देण्यात येत आहे. |

**३.जाहिरातीच्या अनुषंगाने रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | वेतन श्रेणी (७ वा वेतन आयोग) | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | पर्यावरण अभियांत्रिकी सेवा श्रेणी-१ | पर्यावरण संवर्धन अधिकारी | S-२० ५६१००-१७७५०० | १ |
| २ | तांत्रिक सेवा श्रेणी-१ | सिस्टिम मॅनेजर ई-प्रशासन | S-१५ ४१८००-१३२३०० | १ |
| ३ | वैद्यकीय सेवा श्रेणी-२ | वैद्यकीय अधिक्षक (मनपा दवखाने विभाग) | S-१५ ४१८००-१३२३०० | १ |
| ४ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-२ | शाखा अभियंता (स्थापत्य) | S-१५ ४१८००-१३२३०० | २ |
| ५ | विधी सेवा श्रेणी -२ | विधी अधिकारी | S-१५ ४१८००-१३२३०० | १ |
| ६ | अग्निशमन सेवा श्रेणी-२ | अग्निशमन केंद्र अधिकारी | S-१५ ४१८००-१३२३०० | १ |
| ७ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | S-१४ ३८६००-१२२८०० | ४ |
| ८ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (पा.पु) | S-१४ ३८६००-१२२८०० | ४ |
| ९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | S-१४ ३८६००-१२२८०० | १ |
| १० | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | कर अधिक्षक | S-१४ ३८६००-१२२८०० | २ |
| ११ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी-३ | औषध निर्माता (फार्मासिस्ट) | S-१३ ३५४००-११२४०० | १ |
| १२ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | सहाय्यक कर अधिक्षक | S-१३ ३५४००-११२४०० | ४ |
| १३ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | कर निरीक्षक | S-१० २९२००-९२३०० | ४ |
| १४ | अग्निशमन सेवा श्रेणी-३ | चालक - यंत्रचालक | S-६ १९९००-६३२०० | ९ |
| १५ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | लिपीक टंकलेखक | S-६ १९९००-६३२०० | १० |
| १६ | अग्निशमन सेवा श्रेणी-३ | फायरमन | S-५ १८०००-५६९०० | ३० |
| १७ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | व्हॉलमन | S-१ १५०००-४७६०० | ४ |

| | |
|---|---|
| ४ | **पात्रता** |
| ४.१ | उमेदवार भारतीय नागरीक असावा. |
| ४.२ | शैक्षणिक अर्हता व अनुभव- लातूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम २०१९ व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार |

| अ. क्र. | संवर्ग | पदनाम | नेमणूकीकरिता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| १ | पर्यावरण अभियांत्रिकी सेवा श्रेणी-१ | पर्यावरण संवर्धन अधिकारी | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पर्यावरण अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) पर्यावरण क्षेत्रातील किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड) MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| २ | तांत्रिक सेवा श्रेणी-१ | सिस्टिम मॅनेजर ई-प्रशासन | अ) संगणक विषयासह बी.ई/बी.टेक/एम.सी.ए. पदवी.<br>ब) प्रोग्रामिंग, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेटा सेंटर अॅडमिनीस्ट्रेशन, नेटवर्कींगमधील किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क)मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड) MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | वैद्यकीय सेवा श्रेणी-२ | वैद्यकीय अधिक्षक (मनपा दवखाने विभाग) | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.) .<br>ब) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक.<br>क)शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>इ)MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ४ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-२ | शाखा अभियंता (स्थापत्य) | अ)मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>क) MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ५ | विधि सेवा श्रेणी -२ | विधि अधिकारी | अ)मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधि शाखेची पदवी.<br>ब)उच्च न्यायालय किंवा त्यांचे अधिपत्याखालील इतर न्यायालयांमध्ये किमान ३ वर्षे अधिवक्ता/वकील म्हणून कामाचा अनुभव आवश्यक.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड)MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र . |
| ६ | अग्निशमन सेवा श्रेणी-२ | अग्निशमन केंद्र अधिकारी | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>आ)राष्ट्रीय अग्निशामन सेवा महाविद्यालय, नागपुर येथुन B.E.Fire Engineering उत्तीर्ण किंवा राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील Station Officer & Instructor पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असावा किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा किंवा The Institution of Fire Engineers (U.K.) किंवा (India) या संस्थेकडून Grade-I ही पदवी प्राप्त केलेली असावी.<br>इ)मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ई)MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ७ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | अ)मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब)नेमणुकीनंतर ३ वर्षात कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक.<br>क)मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड)MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ८ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (पा.पु) | अ)मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब)नेमणुकीनंतर ३ वर्षात कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक.<br>क)मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड)MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी-३ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | अ)मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी (Mechanical)अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब)नेमणुकीनंतर ३ वर्षांत कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक.<br>क)मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड)MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| १० | प्रशासकीय सेव श्रेणी-३ | कर अधिक्षक | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>क)MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ११ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी-३ | औषध निर्माता (फार्मासिस्ट) | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची विज्ञान शाखेची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.<br>ब) सांविधानिक विद्यापीठातून बी.फार्म.(B.Pharm) पदवी उत्तीर्ण<br>क) महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र महाराष्ट्र फार्मसी अॅक्ट, १९४८ (८ ऑफ १९४८) नुसार वैध नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक.<br>ड) संबंधित विषयाच्या कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>इ) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>फ)MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| १२ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | सहाय्यक कर अधिक्षक | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>क)MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| १३ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | कर निरीक्षक | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब)शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेकडील कर विषयाशी संबंधित कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड) MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| १४ | अग्निशमन सेवा श्रेणी-३ | चालक - यंत्रचालक | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>ब) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण.<br>क) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>ड) जड वाहन चालक म्हणून किमान ३ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक.<br>इ) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>फ) शारीरिक पात्रता:-<br>१.उंची किमान १६५ सें.मी.(महिला उमेदवारांची उंची किमान १६२ सें.मी.)<br>२. छाती- साधारण ८१ सें.मी. फुगवून-५ सें.मी.जास्त ( महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>३. वजन- किमान ५० कि.ग्रॅ.<br>४. दृष्टी- चांगली. (विना चष्म्याने दृष्टी – ६/६ तसेच Ishihara Chart नुसार रंगदृष्टी चांगली)<br>ग) वयोमर्यादा:-<br>ह) उमेदवाराचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक असू नये. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १५ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | लिपीक टंकलेखक | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे व इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड) MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| | १६ | अग्निशमन सेवा श्रेणी-३ | फायरमन | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>ब) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड) शारीरिक पात्रता:-<br>१. उंची किमान १६५ सें.मी.(महिला उमेदवारांची उंची किमान १६२ सें.मी.)<br>२. छाती- साधारण ८१ सें.मी. फुगवून-५ सें.मी.जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>३. वजन- किमान ५० कि.ग्रॅ.<br>४. दृष्टी- चांगली. (विना चष्म्याने दृष्टी — ६/६ तसेच Ishihara Chart नुसार रंगदृष्टी चांगली)<br>इ) वयोमर्यादा:-<br>उमेदवाराचे वय ३० वर्षापेक्षा अधिक असू नये.(माजी सैनिक वगळून)<br>फ) MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| | १७ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | व्हॉलमन | अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शांलात प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C) उत्तीर्ण.<br>ब)शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे पंप ऑपरेटर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड) MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ४.३ | अनुभव:-<br>१. महाराष्ट्र शासन सामन्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/०४/१२,दिनांक ०३/०७/२००४ अन्वये नियुक्तीसाठी विहित केल्यानुसार अनुभव ग्राह्य धरण्यात येईल.<br>मुळ कागदपत्रे तपासणी वेळी उमेदवाराने मुळ अनुभव प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. | | | |
| ४.४ | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/२०११/१३, दिनांक २३/०८/२०११ मधील आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वायतत संस्था इत्यादीच्या विविध पदविका, पदवी व पदव्युत्तर पदव्यांना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभाग (शिक्षण विभाग) मंत्रालयाकडून केंद्र शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी वेळोवेळी प्रदान केलेली समकक्षता महानगरपालिकेच्या सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. | | | |
| ५ | वयोमर्यादा:-<br>१. चालक-यंत्रचालक, फायरमन:- कमाल वय ३० वर्षे. (फायरमन — माजी सैनिक वगळून)<br>२. शासन निर्णय क्र.एसआरव्ही/प्र.क्र.४०४/कार्या-१२, दि.२५/०४/२०१६ नुसार सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे राहील तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.<br>३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दि.२९ मे २०१९ अन्वये दिव्यांग उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १५ | प्रशासकीय सेवा श्रेणी-३ | लिपीक टंकलेखक | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे व इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड) MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| | १६ | अग्निशमन सेवा श्रेणी-३ | फायरमन | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>ब) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड) शारीरिक पात्रता:-<br>१. उंची किमान १६५ सें.मी.(महिला उमेदवारांची उंची किमान १६२ सें.मी.)<br>२. छाती- साधारण ८१ सें.मी. फुगवून-५ सें.मी.जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>३. वजन- किमान ५० कि.ग्रॅ.<br>४. दृष्टी- चांगली. (विना चष्म्याने दृष्टी – ६/६ तसेच Ishihara Chart नुसार रंगदृष्टी चांगली)<br>इ) वयोमर्यादा:-<br>उमेदवाराचे वय ३० वर्षापेक्षा अधिक असू नये.(माजी सैनिक वगळून)<br>फ) MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र . |
| | १७ | तांत्रिक सेवा श्रेणी-३ | व्हॉलमन | अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C) उत्तीर्ण.<br>ब)शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे पंप ऑपरेटर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>ड) MS-CIT किंवा DOEEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणताही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र . |
| ४.३ | अनुभव:-<br>१. महाराष्ट्र शासन सामन्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/०४/१२,दिनांक ०३/०७/२००४ अन्वये नियुक्तीसाठी विहित केल्यानुसार अनुभव ग्राह्य धरण्यात येईल.<br>मुळ कागदपत्रे तपासणी वेळी उमेदवाराने मुळ अनुभव प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. | | | |
| ४.४ | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/२०११/१३, दिनांक २३/०८/२०११ मधील आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वायत्त संस्था इत्यादीच्या विविध पदविका, पदवी व पदव्युत्तर पदव्यांना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभाग (शिक्षण विभाग) मंत्रालयाकडून केंद्र शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी वेळोवेळी प्रदान केलेली समकक्षता महानगरपालिकेच्या सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. | | | |
| ५ | वयोमर्यादा:-<br>१. चालक-यंत्रचालक, फायरमन:- कमाल वय ३० वर्षे. (फायरमन – माजी सैनिक वगळून)<br>२. शासन निर्णय क्र.एसआरव्ही/प्र.क्र.४०४/कार्या-१२. दि.२५/०४/२०१६ नुसार सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे राहील तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.<br>३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दि.२९ मे २०१९ अन्वये दिव्यांग उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. | | | |

४. सामान्य प्रशासन विभाग शुध्दीपत्र क्र.मासेक १०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०/०८/२०१० अन्वये दिव्यांग माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, वयाची कमाल मर्यादा ४५ वर्षपर्यंत राहील.

५. महाराष्ट्र प्रशासन, सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.मासेक १०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०/०८/२०१० अन्वये माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेत सवलत-उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्ष इतका राहील.

६. प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक विकाक २२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दि.०४/११/२०१६)

७. पदवीधर अंशकालीन उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ५५ वर्ष राहील. (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अशंका १९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दि.०२/०१/२०१९)

८. शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी शासन परिपत्रक्र क्र.एसआरव्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२, दि.०१/११/२००३ मधील तरतूदीनुसार ज्या पदांकरीता कही वर्षाचा अनुभव आवश्यक आहे, अशा पदांकरीता सेवा प्रवेश नियमातील कमाल वयोमर्यादा अधिक संबंधित पदास विहित केलेल्या अनुभवाचा कालावधी इतपत किंवा पदाच्या विशेषज्ञतेनुसार व आवश्यकतेनुसार मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५० वर्ष मर्यादेपर्यंत व खुला प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४५ वर्ष मर्यादेपर्यंत अशी वयोमर्यादा फक्त शासन सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांच्याकरीता विहित करण्यात येत आहे.

९. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि.२० ऑगस्ट ,२०१९ अन्वये अनाथ संवर्गामधील उमेदवारांना मागासवर्गीय प्रमाणे वय व फी मध्ये सवलत देण्यात येईल.

१०. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दि.३/३/२०२३ नुसार कोरोनाच्या पार्श्वभूमीवर- कमाल वयोमर्यादेत २ वर्ष शिथिलता अनुज्ञेय असेल.

११. एखादा उमेदवार वयोमर्यादेतील सवलतीपैकी एकापेक्षा जास्त सवलतीकरीता पात्र ठरत असल्यास पात्र सवलतीपैकी अधिकतम सवलत अनुज्ञेय राहील.

१२.

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | | प्रावीण्य प्राप्त खेळाडू कमाल वयोमर्यादा | दिव्यांग माजी सैनिक, भूकंपग्रस्त प्रकल्पग्रस्त कमाल वयोमर्यादा | माजी सैनिक (कमाल वयोमर्यादेत सूट) | दिव्यांग उमेदवार कमाल वयोमर्यादा | पदवीधर अंशकालीन उमेदवार कमाल वयोमर्यादा | प्रकल्पग्रस्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्गीय व अनाथ आ.दु.घ. | | | | | | |
| अर्ज सादर करणेसाठी विहीत अंतिम दिनांक | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४५ | झालेली सेवा +३ वर्ष | ४५ | ५५ | ४५ |

- उपरोक्त नमूद वयोमर्यादा ही अर्ज सादर करणेसाठी विहीत अंतिम दिनांकास विचारात घेतली जाईल.

चालक यंत्रचालक, फायरमन यांची कमाल वयोमर्यादा ३० वर्ष राहील व त्यामुळे अग्निशमन सेवांतर्गत सर्व पदांना कोणत्याही प्रकारची वयाची सूट अनुज्ञेय नाही. फायरमन या पदासाठी माजी सैनिक पात्र असल्यामुळे फक्त माजी सैनिकांना वयाबाबत सूट लागू राहिल.

## ६.निवड पध्दत

| | |
|---|---|
| ६.१ | परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. परीक्षेचे ठिकाण दिनांक व वेळ ई-मेल किंवा एस.एम.एस. (SMS) द्वारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल. तसेच लातूर महानगरपालिका अधिकृत संकेतस्थळ व परीक्षा संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात येईल. |
| ६.२ | उमेदवारांना आवश्यक केलेली अर्हता अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. |
| ६.३ | प्रत्यक्ष मुलाखती फक्त वरील पैकी श्रेणी- अ मधील पर्यावरण संवर्धन अधिकारी व सिस्टिम मॅनेजर ई-प्रशासन या पदांसाठी असेल. |
| ६.४ | शासन निर्णय प्रनिमं १२२२/प्र.क्र.५४/का-१३ अ दि. ४ मे २०२२ अन्वये श्रेणी-ब (श्रेणी-२) व श्रेणी-क (श्रेणी-३) या पदांची मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही. |
| ६.५ | उमेदवारांची निवड निव्वळ गुणवत्तेच्या आधारे केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकुण गुणांच्या किमान ५० %गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. परंतु अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग/सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग/इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५० % ऐवजी ४५ % गुण मिळविण्याची अट राहील. |
| ६.६ | परीक्षेनंतर पात्र उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ६.७ | सरळसेवा भरतीकरिता घेण्यात येणा-या लेखी परीक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची / उत्तरपुस्तिकांची गुणपडताळणी अथवा फेर तपासणी केली जाणार नाही. अथवा या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| ६.८ | उमेदवार विशिष्ट पदावर नेमणुक होण्यास कितपत योग्य आहे. आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे ते आजमावणेकरिता परीक्षेच्या वेळी विचारण्यात येणा-या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नावरोबरच ज्यासाठी अर्ज केलेला असेल त्या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी व त्याला असलेली माहिती आणि जनतेच्या समस्या या संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल. |
| ६.९ | पात्र ठरणा-या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणा-या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण करण्यात येईल. त्यावावतची यादी व वेळापत्रक लातूर महानगरपालिकेच्या अधिकृत व परीक्षा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच ई-मेलवर अथवा मोबाईलवर मेसेजद्वारे कळविणेत येईल. |
| ६.१० | कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र, वयावावतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, इ. बाबतची सर्व मुळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकीत प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळुन आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करणेत येईल व त्यावावत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| ६.११ | कागदपत्रे तपासणीनंतर निवड यादी व प्रतिक्षा यादी लातूर महानगरपालिकेच्या www.mclatur.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. |
| ६.१२ | प्रमाणपत्र तपासणीकरीता येते वेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची स्वसाक्षांकीत (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. |
| ६.१३ | पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याने रजिस्टर्ड केलेल्या ई-मेल व मोबाईल क्रमांकावर SMS किंवा Email द्वारे कळविण्यांत येईल. |
| ६.१४ | कृपया नोंद घ्या की नोंदणी प्रक्रियेनंतर, प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासाठी एक लिंक विकसित केली जाते. एकदा लातूर महानगरपालिका द्वारे लिंक होस्ट केल्यानंतर, उमेदवारांना Email-SMS द्वारे त्यावद्दल सुचित केले जाईल. उमेदवार थेट लिंकवरुन त्यांचे प्रवेशपत्र डाऊनलोड करु शकतात. प्रवेशपत्रावावत कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. |
| ६.१५ | निवडसूचीची कालमर्यादा |
| अ) | शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.०४ मे, २०२२ मधील परिच्छेद ११ मधील तरतुदीनुसार निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. |
| ब) | सर्व संवर्गातील श्रेणी-क च्या पदासाठी निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रुजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनसार, किंवा जात प्रमाणपत्र/अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता/अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रुजू झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यू झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या त्या प्रवर्गाच्या निवडसूचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. मात्र, अशी कार्यवाही निवडसूचीच्या कालमर्यादेत करण्यात येईल. |

## ७.समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी

| | |
|---|---|
| ७.१ | अ) आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| | ब) समान गुण प्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अनुक्रमांक (अ) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे. |

| | |
|---|---|
| | क) वरील अ.क्र.(अ) व (ब) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांक उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर पदवीधर,उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणा-या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |
| | ड) वरील अनु क्रं. (अ), (ब) व (क) या तिन्ही अटीमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत सदर पदाच्या सेवा प्रवेशनियमामध्ये विहीत असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |
| ७.२ | सेवाप्रवेश नियम / जाहिरात/अधिसूचनेमध्ये अनुभव विहित केला असल्यास, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास धारण करीत असलेल्या विहित अनुभवाचा कालावधी. |
| ७.३ | वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ता क्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल. |
| टीप- | आत्महत्याग्रस्त शेतक-यांचा पाल्य म्हणजे शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रं. एससीवाय १२०५/प्र.क्रं.१८९/म-७ दिनांक २३ जानेवारी २००६ अन्वये गठीत करण्यांत आलेल्या जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षते खालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतक-याच्या आत्महत्या प्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतक-याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी) होय. |

**८.अर्ज, अर्हता, इत्यादी.**

| | |
|---|---|
| ८.१ | लातूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील ऑनलाईन पध्दतीने अधिकृत Link वरुन भरलेलल्या अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांक व वेळेनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. |
| ८.२ | महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. त्याचवेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल, त्या पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेला अंतिम दिनांक इत्यादी तपशील आपल्या विभाग / कार्यालय प्रमुखांना कळवावा व याबाबत ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे. |

**९.परीक्षा**

| | |
|---|---|
| ९.१ | श्रेणी अ,ब व क मधील पदासाठी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास ती खालीलप्रमाणे राहील.परिक्षेसाठी मराठी, इंग्रजी सामान्य ज्ञान, बुध्दीमत्ता चाचणी या विषयावर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील.१०० प्रश्न वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपाचे असून प्रत्येक प्रश्नास १ गुण असतील.(एकुण गुण १००) परीक्षेसाठी १२० मिनिटांचा कालावधी अनुज्ञेय राहील.<br>परीक्षा ही वरील श्रेणी अ,ब व क मधील पदाची शैक्षणिक अर्हता, कामाचे स्वरुप, भाषा, सामान्यज्ञान,बुध्दिमत्ता चाचणी, तांत्रिक ज्ञान इ.यांचेशी संबंधित राहील. |

**प्रश्नपत्रिकेची संख्या- एक (प्रत्येक पदासाठी)** **एकूण गुण-१००**

| अ. क्र. | पदनाम | विषय (प्रश्न संख्या) | प्रश्नांच्या काठीण्य पातळीचा स्तर | माध्यम | प्रश्न संख्या | गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पर्यावरण संवर्धन अधिकारी | मराठी (१५),<br>इंग्रजी(१५),<br>सामान्य ज्ञान(१५),<br>बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | पर्यावरण अभियांत्रिकी संबंधित (४०) | पर्यावरण अभियांत्रिकी पदवी समकक्ष | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| २ | सिस्टिम मॅनेजर ई-प्रशासन | मराठी (१५),<br>इंग्रजी(१५),<br>सामान्य ज्ञान(१५),<br>बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | संगणक विषयासह बी.ई/बी.टेक/एम.सी.ए. पदवी संबंधित (४०) | संगणक विषयासह बी.ई/बी.टेक/एम.सी.ए. पदवी समकक्ष | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | वैद्यकीय अधिक्षक (मनपा दवाखाने विभाग) | मराठी (१५), इंग्रजी(१५), सामान्य ज्ञान(१५), बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.)संबंधित (४०) | वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.) समकक्ष | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| ४ | शाखा अभियंता (स्थापत्य) | मराठी (१५), इंग्रजी(१५), सामान्य ज्ञान(१५), बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | स्थापत्य (Civil) संबंधित (४०) | स्थापत्य (Civil) पदवी समकक्ष | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| ५ | विधि अधिकारी | मराठी (१५), इंग्रजी(१५), सामान्य ज्ञान(१५), बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | विधि शाखेची पदवी. संबंधित (४०) | विधि शाखेची पदवी समकक्ष | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| ६ | अग्निशमन केंद्र अधिकारी | मराठी (१५), इंग्रजी(१५), सामान्यज्ञान(१५), बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | १)B.E.Fire Engineering<br>२) Station Officer & Instructor Diploma<br>३) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६<br>४) एकत्रीकृत विकास व प्रोत्साहन, नियंत्रण नियमावली (४० गुण) | B.E.Fire Engineering या पाठयक्रमाची काठीण्य पातळी | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| ७ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | मराठी (१५), इंग्रजी(१५), सामान्य ज्ञान(१५), बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | स्थापत्य (Civil) संबंधित (४०) | स्थापत्य (Civil) पदवी परीक्षा समकक्ष | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| ८ | कनिष्ठ अभियंता (पा.पू) | मराठी (१५), इंग्रजी(१५), सामान्य ज्ञान(१५), बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | स्थापत्य (Civil) संबंधित (४०) | स्थापत्य (Civil) पदवी परीक्षा समकक्ष | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | मराठी (१५),<br>इंग्रजी(१५),<br>सामान्य ज्ञान(१५),<br>बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | यांत्रिकी (Mechanical) पदवी संबंधित (४०) | यांत्रिकी (Mechanical) पदवी परीक्षा समकक्ष | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| १० | कर अधिक्षक | मराठी (१५),<br>इंग्रजी(१५),<br>सामान्य ज्ञान(१५),<br>बौध्दीक चाचण(१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | १)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम<br>२)माहिती अधिकार अधिनियम -२००५<br>३)महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ (४० गुण) | १)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम<br>२) माहिती अधिकार अधिनियम -२००५<br>३) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम -२०१५ | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| ११ | सहाय्यक कर अधिक्षक | मराठी (१५),<br>इंग्रजी(१५),<br>सामान्य ज्ञान(१५),<br>बौध्दीक चाचण(१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | १)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम<br>२)माहिती अधिकार अधिनियम -२००५<br>३)महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ (४० गुण) | १)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम<br>२)माहिती अधिकार अधिनियम -२००५<br>३)महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम -२०१५ | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| १२ | कर निरीक्षक | मराठी (२०),<br>इंग्रजी(२०),<br>सामान्य ज्ञान(२०),<br>बौध्दीक चाचणी (२०) | | मराठी व इंग्रजी | ८० | ८० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | १)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम<br>२)माहिती अधिकार अधिनियम -२००५<br>३)महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ (२० गुण) | १)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम<br>२)माहिती अधिकार अधिनियम -२००५<br>३)महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ | मराठी व इंग्रजी | २० | २० | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | औषध निर्माता (फार्मासिस्ट) | मराठी (१५), इंग्रजी(१५), सामान्य ज्ञान(१५), बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | बी.फार्म. पदवी संबंधित (४०) | बी.फार्म.(B.Pharm) पदवी परीक्षेची समकक्ष | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| १४ | चालक - यंत्रचालक | मराठी (१५), इंग्रजी(१५), सामान्य ज्ञान (१५), बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम संबंधित | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) परीक्षा समकक्ष | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| १५ | लिपीक टंकलेखक | मराठी (२५), इंग्रजी(२५), सामान्य ज्ञान(२५), बौध्दीक चाचणी (२५) | | मराठी व इंग्रजी | १०० | १०० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| १६ | फायरमन | मराठी (१५), इंग्रजी(१५), सामान्य ज्ञान(१५), बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम संबंधित (४०) | पाठयक्रमाची काठीण्य पातळी | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |
| १७ | व्हॉलमन | मराठी (१५), इंग्रजी(१५), सामान्य ज्ञान(१५), बौध्दीक चाचणी (१५) | | मराठी व इंग्रजी | ६० | ६० | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे पंप ऑपरेटर या विषयाचा अभ्यासक्रम (४०) | संबंधित ITI पाठयक्रम समकक्ष | मराठी व इंग्रजी | ४० | ४० | | |

९.२ अग्निशमन सेवेतील चालक-यंत्रचालक व फायरमन या पदांकरीता ऑनलाईन परीक्षेकरीता १०० गुण व मैदानी क्षमता चाचणी परीक्षेकरीता १०० गुण अशी एकूण २०० गुणांची परीक्षा असेल.

९.३ अग्निशमन सेवेतील पदांकरीता अर्जात नमूद करण्यात आलेली शारीरिक पात्रता मैदानी चाचणीच्या वेळी तपासण्यात येईल.पदास आवश्यक असलेली किमान पात्रता प्राप्त न केल्यास उमेदवारांची उमेदवारी/निवड रद्द करण्यात येईल.

९.४ चालक-यंत्रचालक व फायरमन या पदांची शारीरिक चाचणी घेणे आवश्यक आहे. त्या पदांसाठी १:७ या प्रमाणात शारीरिक चाचणीसाठी बोलविण्यात येईल. या बाबत उमेदवरांना मेलव्दारे व संकेतस्थळावर कळविण्यात येईल. शारीरिक परीक्षेची गुण प्राप्त झालेनंतर लेखी परीक्षा व शारीरिक चाचणी चे गुण एकत्र करुनच एकत्रित रित्या गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

९.५ श्रेणी - अ मधील पर्यावरण संवर्धन अधिकारी व सिस्टिम मॅनेजर ई-प्रशासन या पदांची मुलाखत घेणे आवश्यक आहे. या बाबत उमेदवरांना मेलव्दारे व संकेतस्थळावर कळविण्यात येईल. मुलाखतीतील गुण प्राप्त झाले नंतर लेखी परीक्षा व मुलाखतीचे गुण एकत्र करुनच एकत्रित रित्या गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

| | |
|---|---|
| ९.६ | परीक्षा ही Computer Based Test पध्दतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे.सत्र १ ते अंतिम सत्र यामधील प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व त्याची काठीण्य पातळी तपासून त्याचे समानीकरण करणेचे (Normalization) पध्दतीने गुणांक निश्चित करुन निकाल जाहीर करणेत येईल. |
| ९.७ | प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांबावत उमेदवारांस काही हरकत घ्यावयाची असल्यास प्रति प्रश्न रु.१००/- इतके शुल्क आकारले जाईल. |
| ९.८ | जाहिरातीत नमूद पदाकरिता अर्ज केलेल्या परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) www.mclatur.org या संकेतस्थळावर परीक्षेच्या किमान ७ (सात) दिवस अगोदर त्यांच्या प्रॉफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येतील.उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र स्वतः www.mclatur.org या संकेतस्थळावरुन काढुन घ्यावे. (तांत्रिक कारणामुळे यामध्ये बदल होऊ शकतो.) |
| ९.९ | परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्राची प्रिंट व ओळखीचा पुरावा (छायाप्रतीसह) सोबत ठेवणे बंधनकारक आहे.त्याशिवाय कोणत्याही उमेदवारास परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही.परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वतःजवळ जपुन ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेश पत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी.<br>**परीक्षा केंद्रांची संभाव्य शहरे अहमदनगर अमरावती, अकोला, छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, धुळे,कोल्हापूर, मुंबई, नागपूर, नांदेड, पूणे,सांगली, सातारा, रत्नागिरी, जळगांव, हिंगोली, धाराशिव, लातूर, परभणी, सोलापूर, ठाणे, पनवेल.**<br>परीक्षा केंद्र प्रवेश पत्रावर ठरवून दिलेप्रमाणे असतील. |
| ९.१० | डिजिटल डायरी, पेजर, मयाक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सीम कार्ड, ब्लू टुथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू , इलेक्ट्रोनिक उपकरणे, वह्या, नोटस परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, डीजीटल घडयाळ, परीगणक (Calculator) इ. प्रकारची साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वतः जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे.असे साहित्य आणल्यास, ते परीक्षा केंद्राच्या बाहेर ठेवून त्याच्या सुरक्षिततेची जबावदारी उमेदवाराची राहील. |
| ९.११ | i. अपंग कल्याण आयुक्तालय यांचे दि.२० डिसेंबर २००६ चे परिपत्रकानुसार तसेच शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांकन्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क्र.२. दिनांक १८/०३/२०१४ अन्वये शासनाने जारी केलेल्या ओदशानुसार दृष्टीहीन,अल्पदृष्टी, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबी संदर्भात व्यवस्था करण्यास परवानगी घेता येईल.त्याकरिता परीक्षेचे वेळी सहाय्यक उपलब्ध करुन देण्याबाबत उमेदवारांने परीक्षेच्या १५ दिवस अगोदर उपायुक्त (सामान्य प्रशासन) लातूर शहर महानगरपालिका यांचेकडे अपंगत्वाच्या प्रमाणपत्रासह सुस्पष्ट लेखी मागणी करणे आवश्यक आहे.अशी सहाय्यकाची मागणी न केल्यास ऐनवेळी सहाय्यकाची मदत घेता येणार नाही व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार चालणार नाही.<br>ii. लेखनिक / सहाय्यक वापरणा-या दिव्यांग व्यक्तीसाठी मार्गदर्शक तत्वे:-<br>दृष्टीहीन उमेदवार आणि उमेदवार ज्यांच्या लेखनाच्या गतीवर कोणत्याही कारणास्तव कायमस्वरुपी प्रतिकूल परिणाम होत आहे, ते ऑनलाईन परिक्षेदरम्यान त्याच्या स्वतःच्या लेखनिकाचा (ii)आणि ( iii) मधील मर्यादेच्या अधीन राहून वापर करु शकतात.<br>• उमेदवाराला त्याच्या/तिच्या स्वखर्चाने स्वतःच्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल.<br>• उमेदवाराने नेमलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा.प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखक या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखकाच्या सेवांसाठी पात्र असलेल्या आणि वापरु इच्छिणा-या उमेदवारांनी काळजीपूर्वक सचित केले पाहिजे. त्यानंतरची कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही.<br>• एका उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करणा-या व्यक्तीस दुस-या उमेदवारासाठी लेखनिक काम करता येणार नाही.<br>• लेखनिक कोणत्याही शैक्षणिक प्रवाहातील असू शकतो. तथापि, विशेष तज्ञ अधिका-यांच्या पदांसाठी लेखनिक हा त्या पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक प्रवाहातील असावा.<br>• उमेदवार आणि लेखनिक या दोघांनाही उचित हमीपत्र द्यावे लागेल की लेखनिकाने वर नमूद केलेल्या लेखनिकेसाठी सर्व विहित पात्रता निकषांची पूर्तता केले आहे.पुढे जर नंतर असे आढळून आले की त्याने/तिने ठरवुन दिलेली कोणतीही पात्रता निकष पूर्ण केले नाहीत किंवा भौतिक तथ्ये दडवली आहेत.तर ऑनलाईन परीक्षेच्या निकालाची पर्वा न करता अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>• जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतात ते परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी किंवा अन्यथा सल्ल्यानुसार २० मिनिटांच्या भरपाईच्या वेळेसाठी पात्र असतील.<br>• लेखनिकाने स्वतःहून उत्तर देऊ नये.असे कोणतेही वर्तन आढळल्यास उमेदवारी रद्द केली जाईल.<br>• फक्त सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांनाच अशी परवानगी दिली जाईल कारण उमेदवारांना दिलेला |

| | |
|---|---|
| | सवलतीचा वेळ प्रणालीवर आधारित असेल.जर त्यांनी/तिने त्यासाठी नोंदणी केली नसेल तर चाचणी आयोजित करणा-या यंत्रणेला अशी सवलत देणे शक्य होणार नाही.सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी न केलेल्या उमेदवारांना अशा सवलतींना परवानगी दिली जाणार नाही.<br>• परीक्षे दरम्यान, कोणत्याही टप्प्यावर, लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. जर चाचणी प्रशासक कर्मचा-यांनी परीक्षेनंतर लिखित प्रश्नांची स्वतंत्रपणे उत्तरे दिल्यास अहवाल दिला गेला तर अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.<br>iii) लोकोमोटर अपंगत्व आणि सेरेब्रल पाल्सी (Locomotor Disability and Cerebral Palsy)असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे लोकोमोटर डिसेबिलिटी आणि सेरेब्रल पाल्सी बाबत कार्यक्षमता कमी होण्याच्या मर्यादेपर्यंत (किमान ४०% दिव्यांग) असेल अशा उमेदवारांसाठी प्रति तास वीस मिनिटे किंवा सवलतीचा वेळ अनुज्ञेय असेल. |
| ९.१२ | लेखी परीक्षेनंतर आवश्यकतेप्रमाणे पात्र उमेदवारांना १:३ या प्रमाणात कागदपत्रे पडताळणीकरिता बोलावण्यात येईल. |
| ९.१३ | काही अपरिहार्य कारणास्तव परिक्षेच्या तारखांमध्ये/परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही. |
| ९.१४ | **ओळख पटवणे**<br>१) परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवारांचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवारांचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) /पारपत्र (Passport) /वाहनचालक परवाना (Driving License)/मतदार ओळखपत्र (Voter ID)/आधार कार्ड, बँक/पोस्ट फोटोसहीतचे पासबुक/शासकीय कर्मचारी ओळखपत्र/फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विद्यापीठ/कॉलेज फोटोसहित ओळखपत्र/बार कौन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे.उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरी पत्रक/उपस्थिती पत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटवीली जाईल.जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही, सदर उमेदवारांचे मुळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.<br>प्रवेशपत्र व ओळखपत्रची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.<br>टिपः- उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वतःची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे.परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणा-या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या / मधल्या / शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यांत आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.<br>रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणुन ग्राह्य धरला जाणार नाही.<br>i. परीक्षेला उशिरा येण्याबाबत - परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणा-या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दोन तास (१२० मिनीटे) असली तरी उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, सुचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण एक तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागेल.<br>ii. निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक / अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करण्यांत येणारी कार्यवाही -<br>उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती/ तपशील देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशील तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशील तयार करुन सादर केला तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य तो फौजदारी गुन्हा दाखल करण्यांत येईल. |
| | **परीक्षेच्या वेळेत किंवा एकुण निवड प्रक्रिये दरम्यान जर उमेदवाराने,**<br>१. अनुचित प्रकार करणे किंवा<br>२. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा<br>३. परिक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा,<br>४. स्वतःच्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा |

| | |
|---|---|
| | ५. स्वतःच्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा.<br>६. दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे.<br>७. परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी याच्याशी अरेरावी करणे उध्दटपणे वागणे त्यांना लाच देऊ पाहणे.<br>अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.<br>१. लातूर महानगरपालिके तर्फे घेण्यात येणा-या वेगवेगळ्या परीक्षेसाठी बसण्यापासुन काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.<br>२. जर उमेदवार लातूर महानगरपालिकेच्या सेवेत आधीच रुजु झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल. |

१०.परीक्षा केंद्र

| | |
|---|---|
| १ | १. सदर परीक्षा प्रवेश पत्रामध्ये नमुद केलेल्या परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेतली जाईल.<br>२. परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादी बाबत बदलाची विनंती मान्य केली जाणार नाही.<br>३. महापालिकेस परीक्षा केंद्र रद्द अथवा नवीन केंद्र समाविष्ट इत्यादी बाबतचे अंतिम अधिकार असतील.<br>४. महापालिकेस उमेदवाराने मागणी केलेल्या परीक्षा केंद्र व्यतिरिक्त केंद्र देण्याचा अधिकार असेल.<br>५. उमेदवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे या संबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी / नुकसानीस महापालिका जबाबदार राहणार नाही. |

**कागदपत्र पडताळणी वेळेस विहीत कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करणे.**

सदर परीक्षेच्या निकालानंतर वरीष्ठतेप्रमाणे १:३ या प्रमाणात उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी बोलविण्यात येईल. उमेदवारांनी खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागु असलेली) सादर करणे अनिवार्य आहे.

| अ.क्रं. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणा पत्र |
| २ | एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता |
| ३ | वयाचा पुरावा |
| ४ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा |
| ५ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा |
| ६ | राखीव प्रवर्गातुन निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र (अज प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक) |
| ७ | वैध नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र |
| ८ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| १० | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| ११ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| १२ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र |
| १३ | विवाहीत स्त्रीयांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा. |
| १४ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा (मराठी विषयासह १० वी / समकक्ष उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र) |
| १५ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र |
| १६ | टंकलेखनाचे प्रमाणपत्र (मराठी / इंग्रजी लागू असेल त्याप्रमाणे) |
| १७ | महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Domicile) |
| १८ | पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन असल्या बाबतचे प्रमाणपत्र |
| १९ | शासन निर्णय मानस २०१२/प्र.क्रं.२७७/३९ दि. ०४.०२.२०१३ मध्ये नमुद प्रमाणे MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र. |

११.इतर सर्वसाधारण अटी / शर्ती / सुचना

| | |
|---|---|
| ११.१ | कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवाशी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे. तसाच अर्थ असेल. |
| ११.२ | जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनु. जाती, अनु.जमाती विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास वर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी यांचेकडुन प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| ११.३ | विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणा-या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, अपंग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही (Non Creamy Layer) याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक आहे. |
| ११.४ | उमेदवारांना परीक्षेची प्रवेशपत्रे, परीक्षेचे वेळापत्रक, बैठक व्यवस्था, कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व अतिरीक्त निवडसुची, अंतिम निवड व अतिरीक्त निवड सुची व इतर सर्व सुचना ह्या वेळोवेळी www.mclatur.org या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सुचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सुचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. |
| ११.५ | उपरोक्त पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी MS-CIT उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे किंवा समकक्ष अर्हता प्रमाणपत्र अनिवार्य आहे. मे महाराष्ट्र शासन माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्रं. मानस २०१२ / प्र. क्रं. २७७ / ३९ दि. ०४.०२.२०१३ व शासन निर्णय क्रं. मानस २०१२ / प्र. क्रं. २७७ / ३९ दि. १६.०७.२०१८ मध्ये विहीत केलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल. |
| ११.६ | गट-अ, गट-ब , गट-क मधील चालक- यंत्रचालक वगळून नव्याने नियुक्ती होणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या संगणक अर्हतेबाबत.<br>महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३ नुसार ज्या पदांची निवड प्रक्रिया सुरु होईल अशा नव्याने नियुक्त होणा-या सर्व अधिकारी/कर्मचा-यांनी संगणक अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील, असे नमुद आहे.त्याअन्वये लातूर शहर महानगरपालिका पदभरती मधील गट-अ, गट-ब,गट-क मधील सर्व संवर्गांमध्ये अर्ज करणा-या उमेदवारांना सदरचे प्रमाणपत्र upload करण्यापासून सुट देण्यात येत आहे. |
| ११.७ | निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्वावर नियुक्तीनंतर लातूर महानगरपालिका सेवा विनियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी लागू होतील. |
| ११.८ | निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रं. अंनियो - १००५/सेवा-४ दि. ३१.१०.२००५ नुसार नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (National Pension Scheme) लागु राहील. |
| ११.९ | शासन निर्णय क्रं. संकिर्ण / २००७ / पडताळणी / नवि-२६, दि. २१.११.२००७ अन्वये, निवड झालेल्याउमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस ठाण्याकडुन प्राप्त झाल्यानंतर त्याची / तिची सदर पदावर नेमणुक केली जाईल. |
| ११.१० | महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्रं. एस.आर.व्ही.-२०००/प्र.क्रं.१७/२०००/२०१२ दि. ०१.०७.२००५ नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| ११.११ | उपरोक्त पदावर अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीपुर्वी मा.जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर यांच्याकडुन वैद्यकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैद्यकीय दृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती दिली जाईल. |
| ११.१२ | उमेदवारास मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे, त्यास मराठी लिहीता, वाचता, बोलता येणे आवश्यक आहे. |
| ११.१३ | उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमुद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल.अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत. |
| ११.१४ | नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवाराने विहीत केलेली इतर बंधपत्र / प्रतिज्ञापत्र / वचनपत्र / करारपत्र इ. विशिष्ट स्वरुपात भरुन दिल्याशिवाय महानगरपालिका सेवेत रुजु करुन घेतले जाणार नाही. |

| | |
|---|---|
| ११.१५ | निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यांत येईल. याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही. |
| ११.१६ | उपरोक्त पदाकरिता नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारासाठी त्यांच्या नेमणुकीच्या मुळ दिनांकापासुन दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. तसेच अशा उमेदवारांचे परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणुन आणि तत्संबंधी कारणे नमुद करुन परिविक्षाधीन कालावधी ६ महिने वाढविता येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर कर्मचारी / अधिकारी यांची सेवा समाप्त करण्यांत येईल. |
| ११.१७ | निवड झालेल्या उमेदवारास महानगरपालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| ११.१८ | उमेदवाराने या भरती प्रक्रिये संदर्भातील माहिती व सुचना लातूर महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया www.mclatur.org वेबसाईट उमेदवारांनी वेळोवेळी पहावी. |
| ११.१९ | उपरोक्त पदाकरिता शासनाकडील किंवा खाजगी कंपनी कडील उमेदवाराने सरळसेवा भरती प्रक्रियेत अर्ज सादर केल्यापासुन निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंग विषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर घडुन आलेले बदल न कळविल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यांत येईल. |
| ११.२० | उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी लातूर महानगरपालिकेकडुन कोणत्याही क्षणी पुर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता आहे. सदर बदल आवश्यकतेनुसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबंधितावर बंधनकारक असतील. असे बदल लातूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यांत येतील. त्याकरिता उमेदवाराने दररोज लातूर महानगरपालिकेच्या वेबसाईटचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील. |
| ११.२१ | महानगरपालिकेने वेळोवेळी घेतलेले निर्णय संबंधितावर बंधनकारक असतील. |
| ११.२२ | परीक्षेसाठी उपस्थित राहणा-या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवासखर्च देय नाही. |

## १३. इतर कलमे

| | |
|---|---|
| १२.१ | परिक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या निर्माण झाल्यास समस्याचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील मात्र पुन्हा चाचणीसाठी उमेदवारांचा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही. समस्या निराकरण करण्याच्या प्रक्रियेत जाण्यास इच्छुक नसलेले किंवा सहभागी होण्यास इच्छुक नसलेले उमेदवार प्रक्रियेतुन नाकारले जातील. |
| १२.२ | भरतीशी संबंधीत सर्व बाबीमध्ये महापालिकेचा निर्णय अंतिम असेल आणि उमेदवारावर बंधनकारक असेल. या संदर्भात लातूर महापालिकेद्वारे कोणताही वैयक्तिक पत्रव्यवहार अथवा चौकशी केली जाणार नाही. |
| १२.३ | परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात घेतल्यास, सत्रांमध्ये वापरल्या जाणा-या वेगवेगळया चाचणीच्या काठीण्य पातळीतील किंचित फरक समायोजित करण्यासाठी विविध सत्रांमधील गुणांकन समतुल्य केले जातील. केंद्राची क्षमता कमी असल्यास किंवा कोणत्याही केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवारासाठी काही तांत्रिक व्यत्यय आल्यास एकापेक्षा जास्त सत्रे आवश्यक राहतील. |
| १२.४ | निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती प्रदान करणे आणि / किंवा प्रक्रियेचे उल्लंघन केल्याच्या घटनांमुळे उमेदवार निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरेल आणि त्याला / तिला भविष्यात कोणत्याही महापालिकेच्या भरती प्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. अशी अपात्रता, नंतर आढळुन आल्यास पुर्वलक्षी प्रभावाने उमेदवार अपात्र होईल. |
| १२.५ | जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक किंवा तद्नुषंगिक अर्हता अर्ज सादर करतेवेळी उमेदवाराने धारण करणे अनिवार्य आहे. |
| १२.६ | फौजदारी गुन्हा व त्याबाबतची न्यायालयीन प्रकरणाची माहिती ऑनलाईन अर्जात भरणे आवश्यक आहे. |

## १४. कर्तव्ये व जबाबदा-या

| | |
|---|---|
| १३ | उपरोक्त पदावरील अधिका-यास जी कर्तव्ये पार पाडण्याचे त्यांना निदेश देण्यात येतील, ती कर्तव्ये आणि जबाबदा-या पार पाडण्याचे महानगरपालिकेकडुन निर्देशीत करण्यात येईल. अशी अन्य कर्तव्ये पार पाडावी लागतील, मा. महापालिका आयुक्त व विभाग प्रमुख यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करुन कार्य करावे लागेल. |

## १५. विशेष सुचना

| | |
|---|---|
| १४.१ | उपरोक्त पदाच्या भरती प्रक्रिये बाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त, लातूर महानगरपालिका यांना असुन कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगीत, रद्द किंवा काही बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, लातूर महानगरपालिका यांनी त्यांचेकडे राखुन ठेवले आहेत. |

| | |
|---|---|
| १४.२ | महानगरपालिकेस सादर करण्यांत आलेली सर्व कागदपत्रे / अभिलेखे ही महानगरपालिकेच्या अभिलेखाचा भाग होतील व शासकीय नियमानुसार वापरण्यांत येतील. |
| १४.३ | जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतुन अपात्र ठरविण्यांत येईल. |
| १४.४ | **मध्यस्थ / ठग / लातूर महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवुन देण्याच्या आश्वासनापासुन सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.** |
| १४.५ | यापुर्वी सदर पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरुन पुन्हा अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १४.६ | परीक्षेची वेळ, दिनांक,ठिकाण परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) याबाबत वेळोवेळी www.mclatur.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| १५ | **मैदानी चाचणी (चालक-यंत्रचालक, फायरमन)** |
| | **पुरुष उमेदवारांसाठी:-** |
| १५.१ | अ) धावणे:- १६०० मीटर धावणे<br>(३० गुण)<br>ब) जमिनीपासून ३३ फुट उंचीवरील खिडकीस लावलेल्या (४६.४' वरील उंचीच्या) ॲल्युमिनियम एक्सटेन्शन शिडीवर खिडकीपर्यंत वर चढून त्याच शिडीने खाली उतरणे.<br>(आरंभ रेषेपासून शिडी २० फुट अंतरावर असेल.)<br>(२० गुण)<br>क) ५० कि.ग्रॅ. वजनाची मानवीय प्रतिकृती खांद्यावर घेऊन दिलेल्या चौकोनी मार्गाने ६० मीटर अंतर धावणे.<br>(२० गुण)<br>ड) २० फुट उंचीपर्यंत रस्सीवर चढणे व उतरणे.<br>(२० गुण)<br>इ) २० पुल-अप्स<br>(१० गुण) |
| | **महिला उमेदवारांसाठी:-** |
| १५.२ | आ) धावणे:- ८०० मीटर धावणे<br>(३० गुण)<br>ब) जमिनीपासून ३३ फुट उंचीवरील खिडकीस लावलेल्या (४६.४' वरील उंचीच्या) ॲल्युमिनियम एक्सटेन्शन शिडीवर खिडकीपर्यंत वर चढून त्याच शिडीने खाली उतरणे.<br>(आरंभ रेषेपासून शिडी २० फुट अंतरावर असेल.)<br>(२० गुण)<br>क) ४० कि.ग्रॅ. वजनाची मानवाकृती खांद्यावर घेऊन दिलेल्या चौकोनी मार्गाने ६० मीटर अंतर धावणे.<br>(२० गुण)<br>ड) गोळा फेक ( गोळयाचे वजन ४ कि.ग्रॅ.)<br>(१० गुण)<br>इ) लांब उडी<br>(१० गुण)<br>फ) १० पुश अप (जोर काढणे)<br>(१० गुण) |
| | **टीप:-**<br>पुरुष व महिला उमेदवारांना वरील मैदानी चाचणी करताना कोणत्याही टप्प्यावर दुखापत झाल्यास ही सर्व जबाबदारी संबंधित उमेदवाराची असेल.सदर उमेदवार मैदानी चाचणीच्या त्याच टप्प्यावर अपात्र करण्यात येतील.त्यांना कोणतीही पुन्हा संधी दिली जाणार नाही व ते महानगरपालिकेकडे कोणताही दावा करु शकणार नाही याची नोंद घ्यावी. |

दिनांक:- २२/१२/२०२३.
ठिकण:- लातूर शहर महानगरपालिका,लातूर

(बाबासाहेब मनोहरे)
आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर